महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२/समोवानि/२०२०/२४ दिनांक :- ०९ नोव्हेंबर, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२०**
**गुण, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत**
**संदर्भ :- जाहिरात क्रमांक :- ०५९/२०२१**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०२० चा अंतिम निकाल दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** सदर परीक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील 'View' अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, तसेच गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करू इच्छिणा-या उमेदवारांना फेरपडताळणीकरिता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. :-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉग-इन करावे.

(३) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(४) उपलब्ध होणा-या गुणपत्रातील गुणांची फेरपडताळणी करावयाची असलेल्या परीक्षेची निवड करून 'Save' बटणवर क्लिक करावे.

(५) सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरिताची सदर वेबलिंक दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**४.** उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरिता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडी वर संपर्क साधता येईल.

**उपसचिव (परीक्षोत्तर-अ.प.)**

**ठिकाण:- मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**